भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.४२०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/०५/२०१७

**१) किराणा दुकानाचे छता वरील कवेलु काढुन आत प्रवेश करुन किराणा सामान व नगदी पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/०५/२०१७ ते ३०/०५/२०१७ चे २०१७ वा. दरम्यान यातील फिर्यादी रविन्द्र प्रल्हाद मेश्राम वय ४५ वर्ष, रा. देवरीदेव यांचा किराणा दुकानाचे छता वरील कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन कवेलु काढुन आत प्रवेश करुन दुकानात ठेवलेला किराणा सामान, साबुन, गल्यातील नगदी १५०/–रु. प्लॉस्टीक डब्यात ठेवलेले नगदी २५००/–रु. मातीचे गल्यातील नगदी ३,५००/–रु. असा एकुण ८,१५०/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**२) अनाधिकृतपणे क्वार्टर मध्ये प्रवेश करण्याचे कारणावरुन जिवेमारण्याची व खोटया केसमध्ये फसविण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

सन २००३ पासुन ते आज पावेतो यातील फिर्यादी नरेश जेठुलाल ऊईके वय ४८ वर्ष, रा. गोबरवाही हा डोंगरी बु. माईन्स येथील कर्मचारी असुन माईन्स तर्फे त्यास राहण्या करीता क्वॉर्टर नं. बीएल ७० आवंटीत केला आहे. यातील आरोपी हा खाजगी इसम असुन तो फिर्यादीचे क्वार्टर मध्ये जबरीने अतीक्रमण, कब्जा करुन फिर्यादी हा जेव्हा त्याचे क्वार्टरचा ताबा घेण्यास जातो तेव्हा आरोपी हा त्यास क्वार्टर मध्ये येण्यास मज्जाव करतो तसेच जिवेमारण्याची, खोटया केस मध्ये फसविण्याची धमकी देत असल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३४१,४४८,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**३) जनावरांना ट्रक मध्ये कोंबुन कत्तल खाण्यात नेवुन कटाई करण्याच्या हेतुने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/०५/२०१७ चे १३.३० वा. ते आज पावेतो. यातील ७१ जनावरे बैल किंमती ३,५५,०००/–रु. चे बाम्हणी गावाचे शेतशिवारा मध्ये लावारीस स्थितीमध्ये मतीन शेख यांचे शेती मध्ये बांधलेले मिळाले ते जनावरे वयस्कर व शेतीच्या कामकाजामध्ये न वापरता दिसुन आले त्यावेळी जनावरांच्या सुरक्षेकरीता व वापरण्या करीता कोणीही इसम जवळ नव्हते ज्या ठिकाणी जनावरे बांधण्यात आली होती त्या ठिकाणी ३ ट्रकचे टायर मार्क मिळुन आले त्यावरुन ट्रकचा शोध घेतला असता ट्रक क्र. एमएच ३१ सीबी ७२३८ हा मिळुन आला सदरची जनावरे वाहनात जनावरांना कोबुन आणुन कत्तल खाण्यात नेवुन कटाई करण्याचे हेतुने बांधुन ठेवल्याचे वाटत असल्याने त्यांचेवर कार्यवाही व्हावी अशा फिर्यादी प्रल्हाद शामराव भुते वय ३९ वर्ष, रा. बाम्हणी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखनी येथे कलम ११(झ) प्राण्याना क्रुरतेने वागविण्याचा कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) खुल्या दारातुन प्रवेश करुन सोन्याची नथ व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक २९/०५/२०१७ चे २१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी रुळीराम शेंडे वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. ४० रा. वार्ड क्र. चान्ना हे आपले कुटुंबासह जेवन करुन अंगणात बसले असता कोणीतरी अज्ञात चोराने गावातील लाईट बंद झाल्याचा पाहुण कुणीही नसल्याची संधी साधुन कोठया कडील खुल्या दारातुन घरात प्रवेश करुन आलमारीतुन १ सोन्याची नथ ३ ग्रॅम, व नगदी ७००/–रु. असा एकुण ८,२००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखनी येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन विवाहितेला हुंडयासाठी शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २७/१२/२०१२ ते ३०/०५/२०१७ पर्यत. यातील पाचही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीला हुंडयाच्या कारणा वरुन आरोपी क्र. १ ते ५ यांनी मानसिक व शारीरीक त्रास दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पो. स्टे. रामटेक येथे अप क्र. ००/१७ कलम ४९८(अ), ३४ भादंवि चे कागदपत्र प्राप्त झाल्याने पो.स्टे. भंडारा येथे कलम ४९८(अ),३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**६) ट्रक भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन समोरुन येणाऱ्या ट्रकला धडक मारुन ट्रक चालकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ३०/०५/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादी ग्यानीराम अमरसिंग मडावी वय २० वर्ष, रा. माजीपुर जि. मंडला म. प्र. हा आपले ट्रक क्र. टीएएन ३३८४ मध्ये कॅबीन मध्ये बसुन भंडारा वरुन साकोली कडे जात असतांना समोरुन येणाऱ्या यातील आरोपी ट्रक चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादी हा बसलेल्या ट्रकला ड्राव्हर साईडला कॅबीनला धडक मारली त्यामुळे ट्रक चालक यास जखमी करण्यास कारणीभुत होवुन आपले ट्रक सोडुन पळुन गेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. कारधा येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**८) अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक ३०/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. मोहाडी, कारधा, सिहोरा, आंधळगाव, लाखांदुर, भंडारा व तुमसर येथे अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५७ लिटर हातभट्टी दारु किंमती ४,४५०/–रु. ३६० मिली लिटर ३६० मिली देशी दारु किंमती १३०/–रु. तसेच जुगारातुन किंमती २२५/–रु. असा एकुन किंमती ४,८०५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ३०/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१ तीन सिटर वाहनांवरती ०४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

31.5

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत,** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.